# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५०६४१ ई-मेल आयडी :- sceapune@gmail.com


जा.क्र.रासनिप्रा/ड वर्ग सं.कृ.का./प्रा.अ./मान्यता/२०१४
दिनांक :२७/१०/२०१४

प्रति,
जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी
तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, चंद्रपुर.

**विषय : 'ड' वर्गातील सहकारी संस्थांच्या निवडणुकीसाठी निवडणुक निर्णय अधिकारी/ प्राधिकृत अधिकारी यांची नेमणुकं व त्यांचे कृती कार्यक्रमाबाबत...**

**संदर्भ :** आपले कार्यालयीन प्रस्ताव जा.क्र.जिउनिचं/सह.संस्था निवडणुका/कृ.कार्यक्रम/२४९०/१४ दि.९/१०/२०१४ रोजीचा प्रस्ताव.

उपरोक्त संदर्भांकीत विषयाकडे आपले लक्ष वेधण्यात येऊन कळविणेत येते की,

२/- संदर्भीय प्रस्तावाव्दारे आपण चंद्रपुर जिल्ह्यातील एकुण १४ तालुक्यांपैकी ७ तालुक्यातील 'ड' वर्गामधील दि. ३१/०३/२०१३ अखेर निवडणुकीस पात्र असलेल्या एकुण २२ सहकारी संस्थाच्या निवडणुकीबाबतच्या कृती कार्यक्रमास मंजुरी मिळणेस्तव या कार्यालयास विनंती केलेली आहे.

'ड' वर्गातील सहकारी संस्थांचे निवडणुका ह्या महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम ७६, महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ चा नियम ६० मधील तरतुदी अंतर्गत व महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) २०१४ मधील नियम ७६ नुसार तसेच संस्थेचे मंजुर उपविधीप्रमाणे पार पाडणे आवश्यक आहे.

सबब त्यास अनुसरुन उपरोक्त संदर्भीय प्रस्तावात नमुद आपल्या जिल्ह्यातील दि.३१/३/२०१३ अखेर निवडणुकीस पात्र 'ड' वर्गातील एकुण २२ संस्थांचा प्राधिकृत अधिकारी नियुक्तीच्या प्रस्तावात शिफारस केल्याप्रमाणे खालील शर्तीस अधिन राहुन सोबत जोडलेल्या **परिशिष्ट अ** मधील त्या त्या संस्थांच्या नावासमोर दर्शविलेल्या व्यक्तिंना प्राधिकृत अधिकारी म्हणुन नियुक्त करण्यात येत आहे. **तसेच उक्त नियुक्त अधिकारी यांनाच त्या त्या संस्थांच्या नियम ७७ नुसार पदाधिकारी निवडीच्या सभेसही प्राधिकृत अधिकारी म्हणुन नियुक्त करण्यात येत आहे.**

१. प्रस्तावात नमुद केलेल्या संस्थांचा प्रस्तावित विशेष साधारण सभेची नोटीस काढण्याचा दिनांक व सभेचा दिनांक यामध्ये नियम ७६ मधील तरतुदीप्रमाणे १५ दिवसांची मुदत असेल याची दक्षता घ्यावी.
२. संस्थेच्या अधिमंडळाच्या विशेष बैठकीचा दिनांक १/११/२०१४ नंतरचा असावा.
३. गृहनिर्माण सहकारी संस्थांचे अधिमंडळाचे विशेष बैठकीचा दिनांक शक्यतो रविवार असावा.
४. प्राधिकरणाचे दि.१८/१०/२०१४ रोजीचे 'ड' वर्ग संस्थांचे निवडणुकीबाबतचे सर्वसाधारणपर मार्गदर्शन सुचना तालुका सहकारी निवडणुक अधिकारी/ जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी यांनी संबंधित प्राधिकृत अधिकाऱ्यास अवगत कराव्यात.
५. 'ड' वर्गात समाविष्ट नसलेल्या संस्थांच्या निवडणुकीकरता प्राधिकृत अधिकारी नेमता येणार नाहीत असे झाले नाही याची खात्री तालुका सहकारी निवडणुक अधिकाऱ्याने प्राधिकृत अधिकारी यांना अवगत करणेपुर्वीच करावी.
६. प्रमाणित लेखापरीक्षक ज्यांची प्राधिकृत अधिकारी म्हणुन नावे सुचविली आहेत ते नामतालिकेवर असल्याची पुन:श्च खात्री प्राधिकृत अधिकाऱ्याला अवगत करणे पुर्वीच करावी.

**सदरचे नियुक्ती आदेश मा. आयुक्त, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मान्यतेने व निर्देशाप्रमाणे निर्गमित करण्यात येत आहे.**

(डॉ. आनंद जोगदंड)
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रत :** माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव संबंधित तालुका सहकारी निवडणुक अधिकारी

# परिशिष्ट अ

## राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाकडील कार्यालयीन पत्र जा.क्र.रासनिप्रा/ड वर्ग सं.कृ.का./प्रा.अ./मान्यता/२०१४ दि. २७ / १० /२०१४ चे आदेशासोबतचे परिशिष्ट

| अ. क्र. | जिल्हा | तालुक्याचे नाव | संस्थेचे नाव | विशेष साधारण सभेचे प्राधिकृत अधिकाऱ्याचे नाव व हुद्दा |
|---|---|---|---|---|
| १ | चंद्रपुर | गोंडपिंपरी | तिरुपती जलगंगा उपसा जलसिंचन सहकारी संस्था म. नंदवर्धन | श्री.एस.एस. बोधे, सहकारी अधिकारी श्रेणी-१ |
| २ | | | श्री गुरुदेव पाणी वापर सहकारी संस्था म.हिवारा | श्री.पी.आर.खोब्रागडे, सहकारी अधिकारी श्रेणी-२ |
| ३ | | | जलसंगोपन लघुपाटबंधारे तलाव पाणी वापर सहकारी संस्था म.विहीरगाव | श्री.एस. बी.कंगाली, कनिष्ठ लिपीक |
| ४ | | चंद्रपुर | भाग्यलक्ष्मी गृहतारण सहकारी संस्था म. चंद्रपुर | रवि ग.वडगावकर, विशेष वसुली अधिकारी, जिल्हा पत संस्थांचा संघ म.चंद्रपुर |
| ५ | | | भाई आचरेकर गृहनिर्माण सहकारी संस्था म. चंद्रपुर | डी.एस.म्हस्के, विशेष वसुली अधिकारी, जिल्हापत संस्थांचा संघ म. |
| ६ | | | शास्त्री गृहनिर्माण सहकारी संस्था म.चंद्रपुर | ॲड.वा.म.खेळकर,वकील,चंद्रपुर |
| ७ | | | मिनिस्ट्रीयल गृहनिर्माण सहकारी संस्था म. चंद्रपुर | एम.जी. चांदेकर, सेवानिवृत्त सहाय्यक निबंधक, चंद्रपुर |
| ८ | | | कर्मविर आदि.गृहनिर्माण सहकारी संस्था म. चंद्रपुर | श्री.एम.टी.गहोकर, सेवानिवृत्त सहकार अधिकारी श्रेणी-१ |
| ९ | | | विकास गृहतारण सहकारी संस्था म. चंद्रपुर | श्री. डी.जी. पांढरे, सेवानिवृत्त अधिक्षक, चंद्रपुर |
| १० | | | गुरुकुल गृहनिर्माण सहकारी संस्था म.चंद्रपुर | बी.आर.देशट्टीवार,सेवानिवृत्त सहायक निबंधक, चंद्रपुर |
| ११ | | पोंभुर्णा | जयकिसान उपसा जलसिंचन सहकारी संस्था म. जामखुर्द | सी.एच.उघडे, सहकार अधिकारी श्रेणी-१, पोंभुर्णा |
| १२ | | | गोसावी तलाव उपसा जलसिंचन सहकारी संस्था म. पोंभुर्णा | सी.एच.उघडे, सहकार अधिकारी श्रेणी-१, पोंभुर्णा |
| १३ | | | ओमसाई पाणी वापर सहकारी संस्था म.थेरगाव | सी.एच.उघडे, सहकार अधिकारी श्रेणी-१, पोंभुर्णा |
| १४ | | बल्लारपुर | काँग्रेसनगर गृहनिर्माण सहकारी संस्था म. बल्लारपुर | एस.डी.नवघरे, सहकार अधिकारी श्रेणी-१, बल्लारपुर |
| १५ | | मुल | उपसा जलसिंचन सहकारी संस्था म.चिरोली | श्री.एस.जी.गोवर्धन, सहकार अधिकारी श्रेणी-१, मुल |
| १६ | | वरोरा | ओमनगर गृहनिर्माण सहकारी संस्था म. वरोरा | श्री.पी.पी.गाडे, सहकार अधिकारी श्रेणी-१ |
| १७ | | | किसान गृहनिर्माण सहकारी संस्था म. माढेळी | श्री.एच.एस.बाटबरई, मुख्य लिपीक |
| १८ | | | चंद्रपुर जिल्हा मध्य. सह. कर्म.गृहनिर्माण सहकारी संस्था | श्री.पी.पी.गाडे, सहकार अधिकारी श्रेणी-१ |
| १९ | | | सुधाकर बळी राजा उपसा जलसिंचन सहकारी संस्था म.तुळाणा | श्री.एच.एस.बाटबरई, मुख्य लिपीक |
| २० | | | आनंद मजुर सहकारी संस्था वरोरा | श्री.पी.पी.गाडे, सहकार अधिकारी श्रेणी-१ |
| २१ | | | जिजाई मजुर सहकारी संस्था म.कोसारसार | श्री.एच.एस.बाटबरई, मुख्य लिपीक |
| २२ | | | मा भवानी मजुर सहकारी संस्था म.वडगाव | श्री.पी.पी.गाडे, सहकार अधिकारी श्रेणी-१ |

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१

(डॉ. आनंद जोगदंड)
सचिव, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे